# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. २/२०२२

विषय: ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२१ (नियोजन फेब्रु/मार्च,२०२२) परीक्षांबाबत विद्यार्थ्यांकरिता मार्गदर्शक तत्वे व सूचना.

संदर्भ: कोविड–१९ च्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेले निर्णय

कोविड–१९ च्या प्रादुर्भावाच्या विद्यापीठाच्या अधिकार मंडळांनी निश्चित केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ या परीक्षांचे ऑनलाईन पध्दतीने करण्यात आलेले आहे. याबाबतची मार्गदर्शक तत्वे व सूचना खालीलप्रमाणे आहेत.

१. प्रथम वर्ष ते अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ या सर्व अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन परीक्षांचे नियोजन दिनांक १५ फेब्रुवारी,२०२२ पासून टप्प्याटप्याने करण्यात आले आहे. या परीक्षा फक्त Online बहुपर्यायी प्रश्नाद्वारे (MCQ), एक तासाची परीक्षा अशा पध्दतीने घेण्यात येतील. Online पध्दतीने होणा–या बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या राहतील. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात येतील.

२. प्रथम वर्ष ते अंतिम वर्ष विद्यार्थ्यांच्या ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ या सत्राच्या परीक्षा या समकक्ष विषयानुसार आयोजित करण्यात आलेल्या आहेत. विद्यार्थ्यांनी विद्यापीठ वेबसाईटवरील अभ्यासक्रम अंतर्गत यावर्षी जाहीर केलेल्या समकक्ष विषय जाणून घेऊन त्याप्रमाणे अभ्यास करुन परीक्षा द्यावी.

३. खाली नमूद केलेल्या प्रथम वर्षाच्या अनुशेषित/नियमित अभ्यासक्रमांच्या परीक्षा महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर आयोजित करण्यात याव्यात.

| | |
|---|---|
| कला | B.A. 2013 |
| वाणिज्य | B.B.A. (Computer Application ) 2016<br>B.B.M. (International Business ) 2013<br>B.B.A. (International Business) 2016<br>B.B.A. (Revised 2013)<br>B.Com. 2013 |
| विधी | B.A.LL.B. (Rev. 2017)<br>LL.B. (Rev. 2017) |
| विज्ञान | B.Sc. (Biotech ) 2013<br>B.Sc. (Animation ) 2016<br>B.C.A. (Science ) 2016<br>B.Sc. (Computer Science) 2013<br>B.Sc. HS (2017)<br>B.Sc. (Regular) 2013 |
| अभियांत्रिकी | M.E. (All Elective Subjects) |

उपरोक्त परीक्षांचे आयोजन केंद्र व राज्य शासनाने कोविड–१९ या पार्श्वभूमीवर निश्चित केलेल्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे आरोग्याची संपूर्ण काळजी घेऊन ऑनलाईन/ऑफलाईन (जसे शक्य होईल तसे) पध्दतीने बहुपर्यायी प्रश्न (MCQ) स्वरुपाच्या परीक्षा या ५० गुणांच्या ६० मिनिटे (एक तास) कालावधीच्या दिनांक १५ फेब्रुवारी, २०२२ पासून महाविद्यालय/परिसंस्था स्तरावर आवश्यक त्या उपलब्ध सुविधांचा वापर करुन करण्यात यावे. यासाठी ६० बहुपर्यायी प्रश्न (MCQ) दिले जातील त्यामधून ५० प्रश्नांची अचूक उत्तरे ग्राहय धरण्यात यावेत.

या परीक्षांचे वेळापत्रक महाविद्यालय /परिसंस्था यांचे संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावे. तसेच यामधील अनुशेषित व नियमित परीक्षार्थीचे पेपर एकाच दिवशी येणार नाहीत याची संपूर्ण काळजी महाविद्यालय/परिसंस्था यांनी घ्यावी.

४. Online परीक्षेत काही तांत्रिक कारणाने अडचणी आल्यास (०२०) ७१५३०२०२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क करावा.

५. Online परीक्षेची संपूर्ण माहिती होण्यासाठी सर्वसाधारण प्रश्नांवर आधारीत सराव परीक्षांचे आयोजन मुख्य परीक्षेपूर्वी दिनांक १० फेब्रुवारी, २०२२ ते दिनांक १२ फेब्रुवारी,२०२२ दरम्यान करण्यात आलेले आहेत. तसेच सर्व संबंधितांना वेळोवेळी अवगत करण्यात येईल.

६. सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' मधील अभ्यासक्रमांच्या सराव परीक्षांचे आयोजन तांत्रिक कारणांमुळे दिनांक १९ फेब्रुवारी,२०२२ ते दिनांक २० फेब्रुवारी,२०२२ या दरम्यान करण्यात आलेले आहे. या सराव परीक्षांचे वेळापत्रक लवकरच विद्यापीठ वेबसाईटवर जाहीर करण्यात येईल.

७. विद्यापीठ अधिकार मंडळाने मान्य केलेल्या परीक्षा आराखडयानुसार विद्यार्थ्यांच्या संबंधित परीक्षेसाठी गुणांचे रुपांतरण केले जाईल. उदा. अभियांत्रिकी अभ्यासक्रमासाठी परीक्षा आराखडयानुसार ७० गुणांची परीक्षा आहे. या अभ्यासक्रमांचे विद्यार्थी ऑक्टोबर/नोव्हेंबर,२०२१ ची ऑनलाईन पध्दतीने ५० गुणांची बहुपर्यायी प्रश्नांवर आधारीत परीक्षा देतील. या परीक्षेत ५० पैकी विद्यार्थ्यास मिळालेले गुण गणितीय सूत्र वापरुन ७० गुणांपैकी मिळालेल्या गुणांत रुपांतरित केले जातील.

८. परिपत्रक क्र. १२५ अंतर्गत येणा—या अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे नियोजन महाविद्यालय स्तरावर विद्यापीठाच्या परीक्षांच्या नियोजनाच्या धर्तीवर करण्यात यावे.

९. सर्व विद्यार्थ्यांना विषयात मिळालेले गुण (Online Score) हे परीक्षेनंतर ४८ तासात Student Profile System मध्ये उपलब्ध करुन देण्यात येतील. त्यानंतर विद्यार्थ्यांनी पुढील ५ दिवसांच्या आत अडचणी व शंका असल्यास तक्रार तेथेच नोंदवावी, Student Profile System मध्ये नोंदविलेल्या तक्रारीच ग्राहय धरण्यात येतील व त्यानंतर कोणत्याही सबबीवर तक्रार स्वीकारली जाणार नाही.

१०. ऑक्टोबर/नोव्हेंबर, २०२१ (नियोजन फेब्रु/मार्च, २०२२) करिता पूर्वी परिपत्रक क्रमांक ०१/२०२२ दिनांक १२ जानेवारी, २०२२ रोजी देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वे व सूचना यांचे अधिक माहितीसाठी अवलोकन करावे.

मा. प्राचार्य/संचालक/महाविद्यालयीन परीक्षा अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वर निर्देशित मार्गदर्शक तत्वे व सूचनांचे अवलोकन करून याबाबत आपल्या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर सेवक व विद्यार्थी यांना आपल्या स्तरावरून सूचित करावे व त्यांच्या शंकांचे निरसन करून विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

संदर्भ :— परीक्षा—समन्वय/२३
दिनांक:— ०८ फेब्रुवारी २०२२

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
पुणे, अहमदनगर, नाशिक जिल्हा.

परिशिष्ट—अ

## Mock Test Schedule
## Date 19/02/2022 to 20/02/2022

| Faculty | Course Name |
|---|---|
| **Arts** | BACHELOR OF ARTS 2019 Credit Pattern |
| **Commerce** | B.B.A. 2019 Credit Pattern |
| **Commerce** | B.B.A.( Computer Application) 2019 Credit Pattern |
| **Commerce** | B.B.A.( International Business ) 2019 Credit Pattern |
| **Commerce** | BACHELOR OF COMMERCE 2019 Credit Pattern |
| **LAW** | B.A.LL.B.(Rev.2017) |
| **LAW** | LLB(Rev.2017) |
| **Management** | BHMCT Credit Pattern 2019 |
| **Management** | DUAL MBA(Only 2016 Pattern) |
| **Management** | M.B.A.(Human Resource Development)(Rev.2020) |
| **Management** | M.B.A.(Information Technology)(Rev.2020) |
| **Management** | MBA 2019 CREDIT PATTERN |
| **Management** | MCA(MANAGEMENT)(Rev.2020) |
| **Science** | B.Sc. (Biotech) 2019 Credit Pattern |
| **Science** | B.Sc.(Hospitality Studies) 2019 Credit Pattern |
| **Science** | B.Sc.(REGULAR) 2019 Credit Pattern |
| **Science** | B.Sc.(REGULAR)(Rev.2013) |
| **Science** | BCA (Science) 2019 Credit Pattern |
| **Science** | BSc(Animation)(REV.2016) |
| | |

*Mock test for candidates who were not coverd in earlier mock test exam are supposed to appear the new mock on 19/02/2022 to 20/02/2022